लोकमत

## स्वातंत्र्यदिनापूर्वी जिल्हा कुपोषणमुक्त करण्याचा जि.प. प्रशासनाचा संकल्प

# जिल्ह्यात ११,४८५ कुपोषित बालके; कुपोषणमुक्तीसाठी त्रिसूत्री कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** जिल्ह्यात सर्व श्रेणी मिळून ११ हजार ४८५ बालके कुपोषित असल्याची नोंद असून, या बालकांना कुपोषणाच्या श्रेणीतून बाहेर काढण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने त्रिसूत्री कार्यक्रमाची आखणी केली. स्वातंत्र्यदिनापूर्वी जिल्हा कुपोषणमुक्त करण्याचा संकल्प जिल्हा परिषदेने सोडला असून, त्याअनुषंगाने कुपोषणमुक्ती कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.


कुपोषणामागे विविध कारणे कारणीभूत आहेत. कुपोषणाच्या श्रेणीतून बालकांना बाहेर काढण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून यापूर्वी अनेकवेळा ठोस प्रयत्न झाले. अधिकाऱ्यांनी कुपोषणग्रस्त बालके दत्तकही घेतली होती; परंतु कुपोषणमुक्तीच्या या लढ्याला अपेक्षित यश आले नाही. सद्य:स्थितीत जिल्ह्यात शून्य ते पाच वयोगटातील २८५ बालके ही कुपोषणाच्या अतितीव्र (सॅम) तर १०६७ बालके ही तीव्र (मॅम) श्रेणीत आहेत. तसेच (एसएडब्ल्यू) बालके २१२० आणि (एमयूडब्ल्यू) बालके ९३६५ असे जिल्ह्यातील एकूण ११४८५ बालके कुपोषित आहेत.

या कुपोषित बालकांना पुढील सहा महिन्यांमध्ये कुपोषणाच्या श्रेणीतून बाहेर काढून येणाऱ्या १५ ऑगस्ट रोजी जिल्हा उपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी महिला व बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग तसेच आरोग्य विभागाच्या समन्वयातून कृती आराखड्याची आखणी केली. जिल्हा परिषदेच्या सभागृहात संयुक्त बैठकही घेतली असून, कुपोषणमुक्तीच्या कृती आराखड्यावरील अंमलबजावणीबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगांबर लोखंडे, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे, शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे, शिक्षणाधिकारी (योजना) गजानन डाबेराव यांच्यासह इतर विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. एखाद्या कुपोषित मुलांकडे बारकाईने लक्ष दिल्यास जास्तीत जास्त दोन महिन्यांत त्याला कुपोषणातून बाहेर काढणे शक्य आहे; मात्र यासाठी बाळाचे योग्य पोषण होणे गरजेचे असल्याचे मत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कोरे यांनी व्यक्त केले. कुपोषण मुक्तीसाठी संबंधित यंत्रणांना कामाला लागण्याचे निर्देश सीईओंनी दिले.

### अतितीव्र, तीव्र गटातील कुपोषित बालके








### त्रिसूत्री कार्यक्रम कोणता?

#### स्तनपानाचे प्रशिक्षण :

- मातेच्या दुधात रोगप्रतिकारक शक्ती असते. मातेचे दूध हे ९० टक्के कुपोषण दूर करु शकते. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व स्तनदा आणि गरोदर मातांना स्तनपान करण्याचे व्यवस्थित प्रशिक्षण आशा आणि अंगणवाडी सेविकेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. याकरीता आशा व अंगणवाडी सेविकांना पोषणाबाबत दोन महिन्यामध्ये तीन वेळा प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

#### पालक अधिकारी व कर्मचारी :

प्रत्येक अंगणवाडी केंद्राकरीता एक पालक कर्मचारी नेमून बालकांकडे विशेष लक्ष देण्याची जबाबदारी या कर्मचाऱ्यावर देण्यात आली. पालक कर्मचाऱ्यांच्या कामावर लक्ष ठेऊन त्यांच्याकडुन काम करुन घेण्याकरीता वर्ग एक दर्जाचा अधिकारी यांची पालक अधिकारी तसेच सहाय्यक पालक अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली.

#### अंगणवाडी सेविकांचे योगदान :

- लहान मुलांचा शारीरिक व बौद्धिक विकास करणे ही अत्यंत महत्वाची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर आहे.
- त्यामुळे जिथे कुपोषित बालक असतील त्या अंगणवाडी सेविकांनी प्रत्येक सॅम, मॅम बालकांकडे २ महिने विशेष लक्ष देतील.



कुपोषण हा गंभीर आजार नसला तरी याकडे दूर्लक्ष करणे जीवघेणे ठरु शकते. जिल्ह्यातुन कुपोषण हद्दपार करुन सुदृढ पिढी घडविण्यासाठी सामुहिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. एक सामाजिक दायित्व म्हणुन या कामाकडे सर्वांनी पाहावे. आशा व अंगणवाडी सेविकांमार्फत विशेषत: सॅम-मॅम श्रेणीतील बालकांकडे विशेष लक्ष दिले जाईल.

**- वैभव वाघमारे,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम



# वाशीम जिल्ह्यात ११ हजार कुपोषित बालके

## स्वातंत्र्य दिनापूर्वी जिल्हा होणार कुपोषणमुक्त ● जि. प. प्रशासनाचा संकल्प


संग्रहित

◆ **वाशीम, २५ फेब्रुवारी**
जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत एकूण ११ हजार ४८५ बालके कुपोषित असून पुढील सहा महिन्यामध्ये या बालकांना कुपोषणातून बाहेर काढून येणाऱ्या स्वातंत्र्यदिनापूर्वी जिल्हा कुपोषण मुक्त होणार असल्याचा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे यांनी व्यक्त केला आहे.

जिल्हा कुपोषणमुक्त करण्याबाबत जिल्हा परिषदेच्या महात्मा फुले सभागृहात बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत कुपोषण मुक्तीचा कृती आराखडा तयार करण्यात आला. यावेळी महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे यांनी कुपोषणाबाबत जिल्ह्यातील परिस्थिती विषद केली.

ते म्हणाले की, जिल्ह्यात शून्य ते पाच वयोगटातील २८५ बालके ही अति तीव्र (सॅम) तर १०६७ बालके ही तीव्र (मॅम) श्रेणीत असे एकूण १३५२ बालके कुपोषित आहेत. तसेच (एस ए डब्ल्यू) बालके २१२० आणि (एम यु डब्ल्यू) बालके ९३६५ असे जिल्ह्यातील एकूण ११४८५ बालके कुपोषित असल्याची माहिती त्यांनी दिली. कुपोषित बालकांची ही आकडेवारी चिंताजनक असून जनजागरण तसेच विषेश प्रयत्नाची गरज आहे असे ते म्हणाले.

### सहकार्याने सुदृढ पिढी घडवूया : वाघमारे

कुपोषणामुळे बालकांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटतो. कुपोषण हा गंभीर आजार नसला तरी याकडे दुर्लक्ष करणे जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे जिल्ह्यातून कुपोषण हद्दपार करुन सुदृढ पिढी घडविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे मत मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी बैठकीत व्यक्त केले.

### कुपोषणाचा मुकाबला करण्यासाठी त्रिसूत्री कार्यक्रम

स्तनपानाचे प्रशिक्षण : मातेच्या दुधामध्ये ९० टक्के कुपोषण दूर करण्याची शक्ती असते. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व स्तनदा आणि गरोदर मातांना स्तनपान करण्याचे व्यवस्थित प्रशिक्षण आशा आणि अंगणवाडी सेविकेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. या करिता आशा व अंगणवाडी सेविकांना पोषणाबाबत दोन महिन्यामध्ये तीन वेळा प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

त्यानंतर या आशा व अंगणवाडी सेविका जिल्ह्यातील सर्व स्तनदा व गरोदर मातांना प्रशिक्षण देतील. लहान मुलांचा शारीरिक व बौद्धिक विकास करणे ही अत्यंत महत्वाची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर आहे. त्यामुळे जिथे कुपोषित बालक असतील त्या अंगणवाडी सेविकांनी प्रत्येक सॅम, मॅम बालकांकडे २ महिने विशेष लक्ष देतील.

प्रत्येक अंगणवाडी करिता एक पालक कर्मचारी नेमून बालकांकडे विशेष लक्ष देण्याची जबाबदारी या कर्मचाऱ्यावर देण्यात आली आहे. पालक कर्मचाऱ्यांच्या कामावर लक्ष ठेऊन त्याच्याकडून काम करून घेण्याकरिता क्लास वन अधिकारी यांची पालक अधिकारी तसेच सहाय्यक पालक अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

बैठकीला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी दिगांबर लोखंडे, महिला बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, जिल्हा आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांच्यासह इतर विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. ◀*(तभा वृत्तसेवा)*

नवभारत

# स्वतंत्रता दिवस से पहले कुपोषण मुक्त होगा जिला

## जिला परिषद प्रशासन ने किया दृढ़ संकल्प

■ **वाशिम, ब्यूरो.** वर्तमान स्थिति में जिले में कुल 11,485 बच्चे कुपोषित हैं. अगले छह माह में स्वतंत्रता दिवस (15 अगस्त) से पहले यह बच्चे कुपोषण से मुक्त हो जाएंगे, ऐसा विश्वास जिप के मुख्यकार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, महिला व बालकल्याण विभाग के उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे व जिला स्वास्थ अधिकारी डा. सुहास कोरे ने संयुक्त रूप से व्यक्त किया है. जिले को कुपोषण मुक्त बनाने को लेकर जि.प. के महात्मा फुले हॉल में एक बैठक आयोजित की गयी. बैठक में कुपोषण को लेकर कार्य योजना तैयार की गयी. जिले में शून्य से पांच वर्ष आयु वर्ग के 285 बच्चे अति गंभीर (सैम) श्रेणी में तथा 1,067 बच्चे गंभीर (मैम) श्रेणी में हैं, इस तरह कुल 1352 बच्चे कुपोषित हैं. उन्होंने यह भी बताया कि जिले में (एसएडब्लू) 2120 बच्चे तथा (एमयूडब्लू) 9365 बच्चे कुल 11,485 बच्चे कुपोषित हैं.

**निपटने के लिए त्रि-आयामी कार्यक्रम:** माता का दूध 90 प्रश कुपोषण दूर करने की शक्ति रखता है. इसलिए जिले की सभी स्तनपान कराने वाली एवं गर्भवती माताओं को आशा एवं आंगनवाड़ी सेविका के माध्यम से स्तनपान का समुचित प्रशिक्षण दिया जाएगा. इसके बाद यह आशा और आंगनवाड़ी कार्यकर्ता जिले की सभी स्तनपान कराने वाली और गर्भवती माताओं को प्रशिक्षित करेंगी.

**2 माह में मुक्ति संभव : डा. कोरे**

अगर आप कुपोषित बच्चे पर बारिकी से ध्यान दें तो उसे दो महीने के अंदर कुपोषण से बाहर निकालना संभव है, लेकिन इसके लिए बच्चे का उचित पोषण जरूरी है, ऐसा जिला स्वास्थ्य अधिकारी डा.सुहास कोरे ने बताया.

**सभी के सहयोग से स्वस्थ पीढ़ी का निर्माण: वाघमारे**

मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे ने कहा कि कुपोषण बच्चों के शारीरिक और बौद्धिक विकास को रोकता है. लेकिन कुपोषण कोई गंभीर बीमारी नहीं है, अगर इसे नज़रअंदाज किया जाए तो यह जानलेवा हो सकता है. जिले से कुपोषण दूर करने एवं स्वस्थ गांव बनाने के लिए सामूहिक प्रयास करने की आवश्यकता है.



### आंगनवाड़ी कार्यकर्ताओं का योगदान

बच्चों का शारीरिक और बौद्धिक विकास आंगनवाड़ी कार्यकर्ताओं की एक बहुत ही महत्वपूर्ण जिम्मेदारी है. इसलिए, जहां कुपोषित बच्चे हैं, वहां आंगनवाड़ी सेविकाएं 2 महीने तक प्रत्येक सैम, मैम बच्चे पर विशेष ध्यान देंगी. प्रत्येक आंगनवाड़ी के लिए एक पालक अधिकारी नियुक्त किया गया है और इस कर्मचारी को बच्चों पर विशेष ध्यान देने की जिम्मेदारी दी गई है. संरक्षक कर्मचारियों के काम की निगरानी करने और उनसे कार्यभार संभालने के लिए क्लास वन अधिकारियों को संरक्षक अधिकारी और सहायक संरक्षक अधिकारी के रूप में जिम्मेदारी दी गई है.

**संकल्प** | जिला परिषद प्रशासन ने उठाया बीड़ा, जिले में 4,485 बालक है कुपोषित

# स्वतंत्रता दिवस से पूर्व वाशिम जिला होगा कुपोषणमुक्त



जिला प्रतिनिधि, | वाशिम

जिले में वर्तमान स्थिति में कुल 11485 बालक कुपोषित है ओर अगले छह माह में इन बालकों को कुपोषण से बाहर निकालकर आनेवाले स्वतंत्रता दिवस (15 अगस्त) से पूर्व जिला कुपोषण मुक्त होने का विश्वास जिला परिषद के मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, महिला व बालकल्याण विभाग के उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे व जिला स्वास्थ्य अधिकारी डा. सुहास कोरे ने संयुक्त रुप से व्यक्त किया। जिला कुपोषणमुक्त करने को लेकर स्थानीय जिला परिषद के महात्मा फुले सभागृह में बैठक का आयोजन कर इसमें कुपोषण मुक्ति का प्रारुप ढांचा तैयार किया गया।

इस अवसर पर महिला व बालकल्याण विभाग के उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे ने कुपोषण को लेकर जिले की परिस्थिति से अवगत कराते हुए बताया की जिले में 0 से 5 वर्ष आयूवर्ग के 285 बालक अतितीव्र (सैम) तो 1067 बालक तीव्र (मैम) श्रेणी में कुल 1352 बालक कुपोषित है। इसके अलावा (SAW) बालक 2120 तो (MUW) बालक 9365 ऐसे जिले के कुल 11485 बालक कुपोषित होने की जानकारी भी उन्होंने दी।

## सभी के सहयोग से सुदृढ़ पीढ़ी बनाएंगे : सीईओ वैभव वाघमारे

कुपोषण के कारण बालकों का शारीरिक व बौध्दिक विकास प्रभावित होता है। कुपोषण भले ही गंभीर बीमारी न हो लेकिन इसकी ओर अनदेखी करना जानलेवा साबित हो सकता है। इस कारण जिले से कुपोषण का निर्वासन कर एक स्वस्थ पीढ़ी तैयार करने के लिए सामुहिक प्रयास करने की आवश्यकता होने का प्रतिपादन जिप के मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे ने बैठक में किया। उन्होंने आगे कहा की कुपोषितों में ग्रामिण क्षेत्र के गरीब और खेतिहर मजदूर परिवारों के बच्चों का प्रमाण अधिक है। इस कारण एक सामाजिक दायित्व के रुप में इस कार्य की ओर देखें। आशा और आंगनवाड़ी सेविकाओं के मार्फत विशेष रुप से सैम-मैम बालकों की ओर विशेष ध्यान देकर उन्हें दो माह में कुपोषण से बाहर निकालने की अपील भी सीईओ वाघमारे ने उपस्थित पालक अधिकारियों से की। बैठक में अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, पंचायत विभाग के उप मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, महिला बाल कल्याण विभाग के उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, जिला स्वास्थ्य अधिकारी डा. सुहास कोरे, शिक्षाधिकारी राजेंद्र शिंदे, उप शिक्षाधिकारी गजानन डाबेराव के अलावा अन्य विभागों के प्रमुख उपस्थित थे।

## कुपोषण का मुकाबला करने के लिए त्रिसूत्री कार्यक्रम



**स्तनपान का प्रशिक्षण :** माता के दुध में 90 प्रतिशत कुपोषण दूर करने की शक्ति होती है। इस कारण जिले की सभी स्तनदा ओर गर्भवति माताओं को स्तनपान करने का व्यवस्थित प्रशिक्षण आशा एवं आंगनवाड़ी सेविकाओं के माध्यम से दिया जाएंगा। इस हेतु आशा व आंगनवाड़ी सेविकाओं को पोषण से सम्बंधित 2 माह में 3 मर्तबा प्रशिक्षण दिया जाएंगा। जिसके बाद यह आशा व आंगनवाड़ी सेविकाएं जिले की सभी स्तनदा ओर गर्भवति माताओं को प्रशिक्षण देंगी।

**आंगनवाड़ी सेविकाओं का योगदान :** छोटे बच्चों का शारीरिक व बौद्धिक विकास करने की बेहद महत्त्वपूर्ण जवाबदारी आंगनवाड़ी सेविकाओं पर है। इस कारण जहां पर कुपोषित बालक होंगे वहां की आंगनवाड़ी सेविकाएं प्रत्येक सैम, मैम बालक की ओर 2 माह विशेष ध्यान देंगी। **पालक अधिकारी व कर्मचारी :** प्रत्येक आंगनवाड़ी के लिए एक पालक कर्मचारी नियुक्त कर बालकों की ओर विशेष ध्यान देने की जवाबदारी इन कर्मचारियों को दी गई है। पालक कर्मचारियों के कार्यों पर ध्यान देकर उनसे काम करवाने के लिए क्लास वन अधिकारी को पालक अधिकारी एवं सहायक पालक अधिकारी के रुप में जबाबदारी दी गई है। **दो माह में कुपोषण से मुक्ति संभव :** किसी कुपोषित बालक की ओर बारिकी से ध्यान देने पर अधिकाधिक दो माह में उसे कुपोषण से बाहर निकालना संभव है। मात्र इसके लिए बच्चे का उचित पोषण होना आवश्यक होने का मत भी जिला स्वास्थ्य अधिकारी डा. सुहास कोरे ने व्यक्त किया। **जिला स्वास्थ्य अधिकारी, डा. सुहास कोरे**

**कुपोषण तालिका : 0 ते 6 वर्ष आयुवर्ग (जनवरी 2024)**

| अ.क्र. | तहसील | SAM | MAM | कुल | SUW | MUW | कुल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वाशिम | 39 | 152 | 191 | 390 | 1571 | 1961 |
| 2 | रिसोड़ | 82 | 227 | 309 | 209 | 1343 | 1552 |
| 3 | मालेगांव | 42 | 197 | 239 | 654 | 2545 | 3199 |
| 4 | मंगरुलपीर | 20 | 124 | 144 | 199 | 1092 | 1291 |
| 5 | कारंजा | 41 | 142 | 183 | 167 | 723 | 890 |
| 6 | मानोरा | 61 | 225 | 286 | 501 | 2091 | 2592 |
| कुल | 285 | 1067 | 1352 | 2120 | 9365 | 11485 | |

# वाशीम जिल्ह्यात ११ हजार कुपोषित बालके

लोकसत्ता वार्ताहर

**वाशीम :** कुपोषण मुक्तीसाठी शासन स्तरावरून वेळोवेळी घोषणा केल्या जातात. मात्र, तरीही कुपोषित बालकांची समस्या कायम आहे. जिल्ह्यात सद्यस्थितीत ११ हजार ४८५ कुपोषित बालके आढळून आली आहेत. आगामी १५ ऑगस्टपर्यंत जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी पुढाकार घेऊन कडक उपाययोजना राबवण्याचे निर्देश दिले आहे.

वाघमारे यांनी जिल्ह्यातील कुपोषण स्थितीचा आढावा घेतला.

> कुपोषणामुळे बालकांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटतो. कुपोषण हा गंभीर आजार नसला तरी याकडे दुर्लक्ष करणे जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे जिल्ह्यातून कुपोषण हद्दपार करून सुदृढ पिढी घडवण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.
>
> **- वैभव वाघमारे,** मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशीम.

बैठकीत महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे यांनी जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी कृती आराखडा तयार करून नियोजन केले. जोल्हे यांनी सांगितले की, जिल्ह्यात शून्य ते पाच वयोगटातील २८५ बालके ही अतितीव्र (सॅम) तर १०६७ बालके ही तीव्र (मॅम) श्रेणीत असे, एकूण १३५२ बालके कुपोषित आहेत. तसेच (एसएडब्ल्यू) बालके २१२० आणि (एमयूडब्ल्यू) बालके ९३६५, असे जिल्ह्यातील एकूण ११४८५ बालके कुपोषित आहेत. ही आकडेवारी चिंताजनक असून यासाठी विशेष प्रयत्नांची गरज व्यक्त केली जात आहे.

कुपोषण मुक्तीसाठी जिल्ह्यात त्रिसूत्री कार्यक्रम राबवला जाणार आहे. मातेच्या दुधामध्ये ९० टक्के कुपोषण दूर करण्याची शक्ती असते. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व स्तनदा आणि गरोदर मातांना स्तनपान करण्याचे प्रशिक्षण आशा आणि अंगणवाडी सेविकेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. याकरिता आशा व अंगणवाडी सेविकांना पोषणाबाबत दोन महिन्यात तीनवेळा प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर या आशा व अंगणवाडी सेविका जिल्ह्यातील सर्व स्तनदा व गरोदर मातांना प्रशिक्षण देतील. अंगणवाडी सेविका प्रत्येक सॅम, मॅम बालकांकडे २ महिने विशेष लक्ष देतील.

पुण्य नगरी

# स्वातंत्र्यदिनापूर्वी जिल्हा होणार कुपोषणमुक्त

## जिल्हा परिषद प्रशासनाचा संकल्प; कुपोषणमुक्तीसाठीची सभा

**वाशीम, दि. २५ (प्रतिनिधी)**

**जिल्ह्यामध्ये सद्यस्थित ११ हजार ४८५ बालके कुपोषित असून पुढील सहा महिन्यामध्ये या बालकांना कुपोषणातुन बाहेर काढुन येणाऱ्या स्वातंत्र्यदिनापूर्वी जिल्हा उपोषण मुक्त होणार असल्याचा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे यांनी २० रोजी संयुक्तपणे व्यक्त केला.**

जिल्हा कुपोषणमुक्त करण्याबाबत जिल्हा परिषदेच्या महात्मा फुले सभागृहात बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत कुपोषण मुक्तीचा कृती आराखडा तयार करण्यात आला. यावेळी महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे यांनी कुपोषणाबाबत जिल्ह्यातील परिस्थिचती विषद केली. ते म्हणाले जिल्ह्यात शून्य ते पाच वयोगटातील २८५ बालके ही अति तीव्र (सॅम) तर १ हजार ६७ बालके ही तीव्र (मॅम) श्रेणीत असे एकुण १ हजार ३५२ बालके कुपोषित आहेत. तसेच (रअह) बालके २ हजार १२० आणि बालके ९ हजार ३६५ असे जिल्ह्यातील एकुण ११ हजार ४८५ बालके कुपोषित असल्याची माहिती त्यांनी दिली. दरम्यान, एखाद्या कुपोषित मुलांकडे बारकाईने लक्ष दिल्यास जास्तीत जास्त दोन माहिन्यामध्ये त्याला कुपोषणातुन बाहेर काढणे शक्य आहे मात्र यासाठी बाळाचे योग्य पोषण होणे गरजेचे असल्याचे मत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे यांनी व्यक्त केले.



या बैठकीला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी दिगांबर लोखंडे, महिला बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे, शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांच्यासह इतर विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

### सर्वांच्या सहकार्याने सुदृढ पिढी घडवुया : सीईओ वाघमारे

कुपोषणामुळे बालकांचा शाररिक व बौध्दिक विकास खुंटतो. कुपोषण हा गंभीर आजार नसला तरी याकडे दूर्लक्ष करणे जीवघेणे ठरु शकते. त्यामुळे जिल्ह्यातुन कुपोषण हद्‌पार करुन सुदृढ पिडी घडविण्यासाठी सामुहिक प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे मत मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी बैठकीत व्यक्त केले. पुढे बोलतांना ते म्हणाले, कुपोषितांमध्ये ग्रामिण भागातील गरीब व शेतमजुर कुटुंबातील मुलांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे एक सामाजिक दायित्व म्हणुन या कामाकडे पाहावे. आशा व अंगणवाडी सेविकांमार्फत विशेषतः सॅम- मॅम बालकांकडे विशेष लक्ष देऊन त्यांना दोन महिन्यामध्ये कुपोषणातुन बाहेर काढण्याचे आवाहन वाघमारे यांनी उपस्थित पालक अधिकाऱ्यांना केले.

### कुपोषणाचा मुकाबला करण्यासाठी त्रिसुत्री कार्यक्रम

स्थनपानाचे प्रशिक्षणः मातेच्या दुधामध्ये ९० टक्के कुपोषण दूर करण्याची शक्ती असते. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व स्तनदा आणि गरोदर मातांना स्थनपान करण्याचे व्यवस्थित प्रशिक्षण आशा आणि अंगणवाडी सेविकेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. या करीता आशा व अंगणवाडी सेविकांना पोषणाबाबत दोन महिन्यामध्ये तिन वेळा प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर या आशा व अंगणवाडी सेविका जिल्ह्यातील सर्व स्तनदा व गरोदर मातांना प्रशिक्षण देतील. अंगणवाडी सेविकांचे योगदानः लहान मुलांचा शाररिक व बौध्दिक विकास करणे ही अत्यंत महत्वाची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर आहे. त्यामुळे जिथे कुपोषित बालक असतील त्या अंगणवाडी सेविकांनी प्रत्येक सॅम, मॅम बालकांकडे दोन महिने विशेष लक्ष देतील. पालक अधिकारी व कर्मचारीः प्रत्येक अंगणवाडी करिता एक पालक कर्मचारी नेमून बालकांकडे विशेष लक्ष देण्याची जबाबदारी या कर्मचाऱ्यावर देण्यात आली आहे. पालक कर्मचाऱ्यांच्या कामावर लक्ष टेऊन त्याच्याकडुन काम करुन घेण्याकरीता क्लास वन अधिकारी यांची पालक अधिकारी तसेच सहाय्यक पालक अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आलेली आहे.

Smart Washim Edition
Feb 26, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com